# रामकृष्ण-विवेकानंद भावधारा केंद्रे

### 'साधना व सेवेचा उत्तुंग आदर्श'

**डॉ. माधव कशाळीकर,** सांगली,
रामकृष्ण विवेकानंद सेवा केंद्र, निपाणी

माझ्या ३७ वर्षांच्या प्राध्यापकीय जीवनात मी श्रीरामकृष्ण, माताजी किंवा स्वामीजी यांच्याविषयी फारसे वाचले नव्हते. निवृत्त झाल्यावर मी सांगलीला स्थायिक झालो आणि निपाणीच्या अजस्र घराचे काय करावे हा प्रश्न समोर उभा राहिला. घर विकून त्याचे १५-२० लाख मिळवावेत हे अंतःकरणाला पटेना. कारण दोन्ही मुले सुस्थितीत व आम्हालाही पुरेशी पेन्शन; तेव्हा घर एखाद्या चांगल्या संस्थेला देऊन अप्रत्यक्षपणे परंतु कायमस्वरूपी समाजसेवा हातून घडावी असा विचार केला.

अनेक पर्यायांपैकी एक कल्पना मात्र अंतःकरणापासून स्फुरली. १०० वर्षांपूर्वी स्वतः स्वामीजींनी स्थापन केलेली, जगभर काम करणारी रामकृष्ण मिशन ही संस्था डोळ्यांपुढे आली. आध्यात्मिक साधनेबरोबरच समाजसेवा करणारे स्वार्थत्यागी संन्यासी ही या संस्थेची परंपरा ! भ्रष्टाचाराचा वासही नसणारी ही संस्था ! त्वरित पुढच्या कार्याला लागलो आणि भराभर घटना घडत गेल्या. स्वामी भौमानंदांनी प्रस्तावाला होकार दिला आणि निपाणीत रामकृष्ण-विवेकानंद सेवा केंद्र रीतसरपणे अस्तित्वात आले.

तेव्हापासून रामकृष्ण भावधारेचा अभ्यास करू लागलो. तो संपलेला नाही व संपणारही नाही !

❖ ❖ ❖

### 'पुणे मठ - व्यवस्थापन कौशल्याचे अप्रतिम उदाहरण'

**डॉ. बी. टी. अडवानी,** कामठी, नागपूर

पुणे मठाला आरंभीच्या काळात अनेक अडचणींशी झुंजताना मी बघितले आहे, तसेच त्याचा क्रमशः विकास होतानाही मी पाहात आहे. या मठात अनेक विद्वान मंडळी, ब्रह्मचारी तसेच संन्यासी आलेले मी पाहतो तसेच मठात; सर्व प्रकारचे लोक एकत्र येऊन काम करताना पाहातो, त्यावेळी एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते, ती म्हणजे पू. भौमानंद महाराज हे प्रत्येक व्यक्तीमधले गुण हेरून त्यांचा मठाच्या सेवाकार्यासाठी उपयोग करून घेतात. यामुळे प्रत्येकालाच एक अपूर्व संधी मिळून त्याचे जीवन धन्य होते. महाराजांच्या या कार्यपद्धतीचा आजच्या Management Science नुसार सखोल अभ्यास व्हायला हवा, अशी माझी मनोमन इच्छा आहे.

❖ ❖ ❖

### 'एक ससंस्मरण'

**स्वामी सेवानंद,** भादोले



पू. स्वामी भौमानंद महाराज, अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे यांच्या कुशल, प्रेरणादायी व प्रेमळ मार्गदर्शनाखाली इ.स. १९८७ साली भादोले येथे 'श्रीरामकृष्ण-विवेकानंद सेवा केन्द्र' स्थापन झाले. आज त्या छोट्या वास्तूचे नव्या उंच इमारतीत रूपांतर झाले आहे. रुग्णालय व प्रार्थनामंदिर नेटकेपणाने उभे आहे. या अत्यंत छोट्या गावी रामकृष्ण-मठ-मिशनचे उपाध्यक्ष येणे, ही अशक्य कोटीतील घटना स्वा. भौमानंद महाराज यांनीच शक्य करून दाखवली.

मला स्वतःला घडवण्यात आणि सेवारत ठेवण्यात त्यांचाच सिंहाचा वाटा आहे.

❖ ❖ ❖

## शिवभावे जीवसेवा

**चंद्रकांत माने,** सचिव,
रामकृष्ण–विवेकानंद आध्यात्मिक सेवा संस्था, सांगली

सन २००५ मध्ये कृष्णामाई कोपली आणि तिच्या पुराने साऱ्या जिल्ह्यात थैमान घातले. गावोगावच्या बातम्यांनी मन विलक्षण अस्वस्थ झाले होते. अशातच पुण्याला गेलो. रामकृष्ण मठात जाऊन पू. भौमानंद महाराजांना भेटलो. प्रणाम करताच ते म्हणाले, ''अरे, तुझ्या सांगलीत महापूर आलाय. जरा परिस्थिती पाहून ये आजूबाजूची. पाहू मठामार्फत काही मदत करता येते का ते.''

त्यांना 'होय' म्हणालो तरी, मठाची या पूरग्रस्तांना काय मदत होणार ? ही शंका मनात आलीच. परंतु त्यांच्या सूचनेप्रमाणे मोटरसायकलवरून फिरून सर्व भाग पाहून त्यांना अहवाल सादर केला.

दोनच दिवसांत मठातील संन्यासी व स्वयंसेवक दोन गाड्या घेऊन येऊन दाखल झाले. स्वामी आत्मविकासानंदांच्या कुशल नेतृत्वाखाली ३४ गावे पिंजून काढली. पूरग्रस्तांच्या नुकसानीचा अंदाज घेतला. अन्नवस्त्राला महाग झालेल्या, उघड्या आभाळाखाली असलेल्या आणि मजुरीला वंचित झालेल्या पूरग्रस्तांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आणि वेगाने कामाला प्रारंभ झाला. २८ गावांतील ४००० कुटुंबांना प्रत्येकी २५ किलो गहू, २५ किलो तांदूळ, २ ब्लँकेट, १ चादर, १ साडी याप्रमाणे अन्नधान्य आणि वस्तू देण्यात आल्या. या प्रसंगी मठाने सर्व मिळून सुमारे ४० लाख रूपयांची मदत केली.

मदतकार्यातील शिस्त, विचार आणि निःस्वार्थता पाहून तत्कालीन अर्थमंत्री जयंत पाटील यांनीही मठाची मोकळेपणाने प्रशंसा केली. कारण शासनाच्या मदतीपूर्वी मठाची मदत योग्य स्थळी जाऊन पोचली होती.

प्रत्यक्षात मठाने केलेले हे काम बघून मी अक्षरशः थक्क झालो. २४ वर्षे मठात जाणारा मी, शंका घेत होतो. पण ठाकुरांनी हा अनुभव मला देऊन रामकृष्ण मठ 'शिवभावे जीवसेवा' कशी करतो हेच दाखवून दिले !

❖ ❖ ❖

## कृपा सावली : रामकृष्ण मठ, पुणे

**श्री. ज्ञानदेव मोरे**
**श्री रामकृष्ण विवेकानंद आध्यात्मिक केंद्र,**
प्लॉट नं. २९, शिवाजी हौसिंग सोसायटी,
राजारामपुरी, ११ वी गल्ली, कोल्हापूर

सूर्यच पृथ्वीचा निर्माता व पालनकर्ता ! पृथ्वीवरील प्रत्येकालाच सूर्याचे हे महत्त्व माहीत असल्याने सूर्यवंदनेनेच अनेकांचा दिवस सुरू होतो. त्याचप्रमाणे कोल्हापूर केंद्राची स्थापना व त्याचे पालन पोषण भौमानंद स्वामीजींनीच केले आहे म्हणून येथील कोणत्याही महत्त्वाच्या घडामोडी त्यांच्या वंदनानेच सुरू होतात व त्यांच्याच आशीर्वादाने साकार होतात. जसे रेल्वेचे इंजिन आपल्या सोबत अनेक डब्यांना खेचून नेते, त्याचप्रमाणे प. पू. स्वामीजींनी पुणे मठास यशाच्या शिखरावर नेत असताना कोल्हापूर केंद्रासही आपल्या सोबत घेतले आहे.

१९८५ सालचा दिवाळी पाडवा ! याच दिवशी प. पू. स्वामी भौमानंदांच्या मार्गदर्शनाने साठमारी येथील केंद्र स्थापन झाले. आजतागायत प्रत्येक वर्षी स्वामीजींनी केंद्राच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वतः हजर राहून अथवा स्वामी सुविज्ञेयानंद महाराजांना प्रतिनिधी रूपात पाठवून केंद्रास मार्गदर्शन केले आहे. दि. २१.४.९५ रोजी श्रीमत् प. पू. स्वामी गहनानंदजी महाराज (त्यावेळचे रामकृष्ण संघाचे उपाध्यक्ष) यांनी कोल्हापूरला भेट दिली. सोबत प. पू. स्वामी भौमानंद महाराज होतेच. सकाळी एकशे पन्नास लोकांना दीक्षा दिली व सायंकाळी कोल्हापुरातील 'हुतात्मा पार्क' या मोठ्या सार्वजनिक बागेमध्ये स्वामी विवेकानंदांच्या भव्य उभ्या पुतळ्याचे अनावरण केले. या प्रसंगी कोल्हापूरचे महापौर, समाजातील अनेक मान्यवर व सुमारे चारशे भक्त उपस्थित होते. या प्रसंगी प. पू. श्रीमत् स्वामी गहनानंदजी महाराज आपल्या व्याख्यानात म्हणाले, ''ज्या कोल्हापुरात आदिमाया श्रीमहालक्ष्मी विराजमान आहे, व ज्या शहरास स्वामी विवेकानंदांनी आपल्या पदधूलीने

पवित्र केले आहे त्या ठिकाणी रामकृष्ण संघाची शाखा असणे आवश्यक आहे, व त्यासाठी अशी जागा मिळवण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा.'' ही वाणी सर्व भक्तांच्या हृदयावर कोरली गेली. केंद्रासाठी १२ एकर जागा विकत घेण्याचे ठरले. प. पू. स्वामी भौमानंदांनी जमीन पाहून ती घेण्यासाठी निकराचे प्रयत्न करण्यास सांगितले. दि. ११.८.९९ रोजी सुकाणू समितीने जमीन घेण्याची शिफारस केली. दि. २६.१०.९९ रोजी जमीन मालकांशी करार करण्यात आला. सर्व भक्तांनी पराकाष्ठेने पैशांची जुळवाजुळव करून दि. २८.७.२००० रोजी जमीन खरेदी केली. काही अडचणी पार करीत आज तिथे साधुनिवासाच्या चार खोल्या एक प्रार्थना मंदिर, एक स्वयंपाक व भोजन कक्ष उभे राहात आहेत व अल्पावधीतच ते काम पूर्णही होईल.

१९८५ साली स्थापन झालेले साठमारी येथील केंद्र १९८७ साली पांजरपोळ येथे स्थलांतरित झाले. त्या ठिकाणी नित्य श्रीरामकृष्णांची आरती, सत्संग, पुस्तक विक्री, ग्रंथालय व विविध सेवाभावी कामे होत राहिली. पण २००५ साली ही पांजरपोळची जागा सोडणे भाग पडले अशा वेळी एका भक्ताने राजारामपुरी ११ व्या गल्लीतील आपली जागा वास्तूसह केंद्रास वापरण्यासाठी देऊ केली. पण ही वास्तू जुनी झाल्याने पाडून टाकून रामकृष्ण मठ–मिशनच्या गरजेनुसार नवीन अत्याधुनिक इमारत बांधण्याचे स्वामीजींच्या आशीर्वादाने ठरले. दि. १३.९.२००८ रोजी प. पू. स्वामी भौमानंद महाराजांच्या हस्ते झालेल्या भूमिपूजनाने या कामाचा शुभारंभ झाला. नजीकच्या काळात ही शहरातील वास्तू व १२ एकरांची जागा ही रामकृष्ण संघाच्या शाखेत रूपांतरित व्हावी ही सर्व भक्तांची इच्छा आहे. व प. पू. स्वामी भौमानंद महाराजांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने त्यांच्याच हस्ते हे कार्य पूर्ण होत आहे.

❖ ❖ ❖

## श्री रामकृष्ण आश्रम - एक वाटचाल

**श्री. पी. एन. चंदाराणा,** श्रीरामकृष्ण आश्रम, यवतमाळ

यवतमाळ येथील श्रीरामकृष्ण आश्रमाची स्थापना १९६२ च्या रामनवमीला झाली. या दिवशी जागेची प. पू. स्वामी राकानंदजी महाराज (श्रीरामकृष्ण मठ, नागपूर) यांनी विधिवत् पूजा केली व भगवान श्रीरामकृष्ण, माँ सारदादेवी व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना केली. तेव्हापासून आश्रमात मंगलारती, पूजा, संध्यारती हे विधी नियमितपणे सुरू झाले.

हा आश्रम स्थापन होण्यास बऱ्याच भक्तांचे व भाविकांचे योगदान लाभले. १९५०–५५ च्या काळात येथील प्रसिद्ध वकील श्री. भाऊसाहेब बर्वे यांचेकडे भक्तगण नियमित जमत असत. त्यांत प्रामुख्याने श्री. अण्णासाहेब जवादे, श्री. रमेश सुळे, श्री. पी. डी. देशपांडे, श्री. जयनारायण अहिर व श्री. नाथालालजी चंदाराणा यांचा समावेश असे. यांशिवाय इतरही अनेक भक्तगण एकत्र येत असत. यांपैकी काही दीक्षित होते व त्यांचा नागपूर मठाशी संपर्क होता. ब्रह्मलीन प. पू. स्वामी भास्करेश्वरानंदजी महाराज यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन त्यांना मिळत असे. रोज होणाऱ्या चर्चेत आश्रम सुरू करण्याबाबत विचार होत असे. स्वामी राकानंदजी महाराज यवतमाळ जिल्ह्यात प्रवचनाकरिता आले की, त्यांचा मुक्काम श्री. भाऊसाहेब बर्वे यांच्याकडे असायचा. त्यांच्याबरोबरही येथे आश्रम सुरू करण्याबाबत चर्चा होत असे. येथे आश्रम सुरू करायचा असे ठरले. जेव्हा जागेबाबत अडचणी जाणवू लागल्या तेव्हा स्वामी राकानंदजींनी सर्व भक्तांना जागेबाबत चिंता करू नये असे आश्वासन दिले.

त्यावेळी कै. वसंतरावजी नाईक (महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री) हे सरकारात महसूल मंत्री होते. प. पू. स्वामी अकामानंदजी महाराज (श्रीरामकृष्ण सेवाश्रम, कनखल) हे नागपूर येथील आश्रमात होते. श्री. वसंतराव नाईक व स्वामी अकामानंदजी हे वर्गमित्र होते. कै. वसंतरावजी नाईक नागपूरला शिकत असताना नियमित आश्रमात येत असत. त्यांची प. पू. स्वामी भास्करेश्वरानंदजी महाराज यांचेवर प्रगाढ श्रद्धा होती. कै. वसंतरावजी नाईक हे

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील आहेत. आपल्या जिल्ह्यात यवतमाळला श्रीरामकृष्ण आश्रम स्थापन होत आहे हे पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. श्री. वसंतरावजी नाईक यांनी नाममात्र किमतीत १८ एकर जागा श्रीरामकृष्ण आश्रमाकरिता दिली. अशाप्रकारे या आश्रमाच्या उभारणीत अनेक भक्तगणांचे सहकार्य लाभले आणि आज सुद्धा लाभत आहे.

येथील आश्रम अतिशय निसर्गरम्य परिसरात आहे. एका बाजूला वनविभागाची जमीन आहे. त्यांनी तिथे वृक्षारोपण केले आहे. आश्रमाच्या दुसऱ्या बाजूला (शहराकडच्या बाजूला) तारेचे कंपाऊंड करण्यात आले आहे. उर्वरित भागात करायचे आहे. सध्या आश्रम परिसरात साधुनिवास, विद्यार्थी भवन, मंदिर, वाचनालय, इतक्या इमारती आहे. या शिवाय माँ सारदा संस्कार केंद्रा करिता (बालवाडी) शाळेच्या दोन खोल्या बांधणे विचाराधीन आहे. या आश्रमाला नागपूर आश्रमाच्या अध्यक्षांचे सतत मार्गदर्शन लाभले आहे. ब्रह्मलीन स्वामी भास्करेश्वरानंद, ब्रह्मलीन व्योमरूपानंदजी महाराज, प. पू. स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले आहे आणि त्यामुळेच आश्रमाची विकासाच्या दृष्टीने योग्य वाटचाल होत आहे.

श्रीरामकृष्ण आश्रम यवतमाळ हा श्रीरामकृष्ण व विवेकानंद भावधारेशी संलग्न असून या ठिकाणी शिवभावे जीवसेवा हा स्वामी विवेकानंदांचा संदेश समोर ठेवूनच आश्रमात विविध उपक्रम राबविण्यात येतात.

❖ ❖ ❖

## इवलेसे रोप लावियले द्वारी ...

**श्रीरामकृष्ण सत्संग मंडळ,**

**ॲडव्होकेट सत्यनारायण ओझा**, इचलकरंजी

पुणे मठाच्या या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या वळणावर उभे राहून मागे पाहाता अनेक आठवणी मनात रुंजी घालू लागतात आणि समोर नजर जाताच पुणे मठाने केलेले प्रचंड कार्य पाहून छाती दडपून जाते. त्यापुढे आमच्यासारखी अनेक खाजगी केंद्रे म्हणजे त्याच्याच साहाय्याने लावलेली आणि वाढलेली रोपे आहेत. अर्थात योग्य वेळी पुणे मठाने या रोपांची मशागत करून योग्य



खत पाणी घालून, कापणी, कोळपणी करून त्यांना आजचा आकार दिला आहे. याचे सारे श्रेय पू. भौमानंद महाराज यांच्याकडेच जाते. त्यांचे मार्गदर्शन व त्यांचा आशीर्वाद हाच आमचा दीपस्तंभ !

१९८६ साली 'विवेकानंद व्याख्यानमाला' आयोजनाने आमच्या इचलकरंजी येथील केन्द्राला सुरूवात झाली. पाच दिवसांच्या या कार्यक्रमात दरवर्षी पहिल्या दिवशी स्वामी भौमानंद महाराज यांचे व्याख्यान तर दुसऱ्या दिवशी श्रीसारदा मठ पुणे केन्द्राच्या पू. योगप्राणामाताजी यांचे व्याख्यान होत असे. उर्वरित वक्तेही महाराज स्वतःच पाठवीत असत. आजही ही व्याख्यानमाला होते. प्रकृति अस्वास्थ्यामुळे महाराज किंवा माताजी न येता त्या त्या मठातील इतर स्वामी व माताजी येत असतात.

आज मंडळाच्या 'रामकृष्ण सत्संग भुवन' व 'विवेकानंद आरोग्य केंद्र' या दोन इमारती श्रीठाकुरांच्या कृपेने उभ्या आहेत. १ जुलै १९९८ रोजी सत्संग भुवनचे उद्घाटन पू. भौमानंद महाराज यांच्या हस्ते झाले, तर ७ डिसेंबर २००८ रोजी विवेकानंद आरोग्य सेवा केन्द्राचे उद्घाटन पू. गौतमानंद महाराज (अध्यक्ष, चेन्नई मठ) यांच्या शुभहस्ते झाले.

वास्तविक पू. स्मरणानंदजींच्या हस्ते हे उद्घाटन व्हावे असे ठरले होते परंतु बेलुर मठाकडून 'यावेळी येणे शक्य नाही. परंतु यासाठी स्वा. भौमानंद सर्वथैव योग्य आहेत. त्यांचेकरवी करून घ्यावे' असे उत्तर आल्याने मी स्वामी भौमानंद महाराजांकडे परत गेलो. परंतु त्यांनी पू. स्वामी गौतमानंदांना विनंती करून स्वतः न करता त्यांचे हस्ते उद्घाटन करवले. मला असे वाटते, पू. भौमानंद महाराजांनी विचार केला असावा, की आपल्याला अपत्यवत असलेल्या या केन्द्राच्या वास्तूचे उद्घाटन आपणच कसे करणार ? यासाठी

मान्यवर अतिथीच आमंत्रित करायला हवा. कार्यक्रमाचे यजमान या नात्याने आपण हजर राहू व त्याप्रमाणे ते खरेच तसे राहिलेही.

सेवा केंद्राची ही जागा आमच्या निवासापासून दूर आहे हे पू. महाराजांच्या ध्यानी आले होते परंतु ते म्हणाले, ‘ज्या लोकांसाठी तुम्हाला ही सेवा द्यायची आहे, त्यांना ही जागा जवळ आहे. सेवा करताना ज्यांची सेवा करायची आहे त्यांची सोय बघायची असते, आपली नव्हे.’ त्यांचा हा सेवेविषयीचा संदेश सदैव स्मरणात ठेवावा असाच आहे.

वय, प्रकृती या कशाचाही विचार न करता ते अनेकदा बांधकाम चालू असताना आले. अनेक सूचना देऊन योग्य तऱ्हेने काम करवून घेतले. अडचणीच्या वेळी मी पदोपदी पुण्यास जाऊन त्यांचा सल्ला घेऊन येई. सहकाऱ्यांना तो सांगे व पुढचे काम निर्विघ्नपणे पार पडे.

खरे तर आमच्यासारख्या प्रत्येक भावधारा केन्द्राची हीच स्थिती असेल. पण आश्चर्य म्हणजे आम्हाला प्रत्येकाला वाटते की, महाराजांचे आपल्यावरच विशेष प्रेम आहे ! पुणे मठाची खरे म्हणजे आपण सारीच आवडती लेकरे आहोत. कोणतीही पूर्वसूचना न करता वेळी अवेळी जावे. जाताच प्रश्न – ‘‘मंदिरात जाऊन दर्शन घेऊन आलास का ?’’ ‘‘हो’’ म्हणताच आदेश व्हायचा ‘‘वरती जेवणघरात जाऊन नाश्ता घे, प्रसाद घे.’’ याच आज्ञा आधी. या पाळल्या की आम्हीही तृप्त ! नंतर आमच्या हजार प्रश्नांना व अडचणींना मिळालेली उत्तरे म्हणजे या तृप्तीवर मिळालेला अतिरिक्त बोनस ! हे सारे घेऊन समाधानाने परतावे – असे पुणे मठाचे व आमचे ऋणानुबंध. हा अनुबंध आहे – मातापित्यांचा व लेकरांचा.

हे कृपाछत्र असेच अखंड राहो, हीच श्रीठाकुर चरणी प्रार्थना.

❖ ❖ ❖

## एक शब्दपुष्पांजली

**श्री. धनंजय विभूती,**

श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा समिती, अहमदनगर

रविवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २००७, तिथी आश्विन शुद्ध तृतीया. वेळ सकाळी ७.००. शंखध्वनीचा नाद कानात घुमू लागतो आणि श्रीठाकुर, जगज्जननी सारदा माँ व विश्ववंद्य जगद्‌गुरू स्वामी विवेकानंद यांच्या



प्रतिमा हृदयाशी धरून प. पू. स्वामी स्मरणानंदजी, प. पू. स्वामी ब्रह्मस्थानंदजी, प. पू. स्वामी विष्णुपादानंदजी, इतर साधू व ब्रह्मचारी वृंद आणि परगावाहून आवर्जून उपस्थित राहिलेले भक्तगण श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा समितीतर्फे उभारल्या गेलेल्या श्रीरामकृष्ण मंदिराच्या उद्‌घाटन सोहळ्यानिमित्त निघालेल्या परिक्रमेत सहभागी झालेले असतात. शंखध्वनी, टाळमृदुंगाचा गजर आणि रामकृष्ण शरणम्‌च्या जल्लोषात हा ठाकुरांचा लाडका भक्तमेळा मंदमंद पावले टाकीत परिक्रमा करीत असतो, तिसऱ्या प्रदक्षिणेला स्वामी भौमानंदजी या मेळाव्यात सहभागी होतात. प्रदक्षिणा पूर्ण होते आणि .... आणि मंदिराचा मुख्य दरवाजा उघडला जातो. दरवाजापासून गर्भगृहाच्या आतील दृश्य पाहून सर्वजण हरखून जातात. दरवाजापासून गर्भगृहापर्यंत आच्छादलेला रंगीबेरंगी फुलांचा गालिचा, गर्भगृहात प्रदीप महाराजांनी तंत्रशुद्ध पद्धतीने प्राणप्रतिष्ठा केलेल्या ठाकुर, माँ, स्वामीजी यांच्या प्रतिमा, फुलांनी सुशोभित केलेले व पूजा साहित्यातील

*With Best Compliments From*
**Giridhar H. Bhatodekar**
B. A., L.L.B., A.C.I.I. (London)

**Ex. Dy. Manager, New India Assurance**
**General Insurance Consultant**
Tel. : 24309118 Cell : 9820302929

धूपचंदनादी द्रव्यांनी सुगंधित झालेले मंदिर मंगलतेलाच जणू मांगल्य बहाल करीत होते. पवित्रतेलाच पावित्र्य आणीत होते. हे सर्व पाहून मन एका वेगळ्याच पातळीवर जाऊन पोहोचले. आनंदाचे एक वेगळेच परिमाण मन अनुभवत होते. जीवनात काय केले या प्रश्नाच्या उत्तरपत्रिकेत आम्हा भक्तांना निदान एक ओळ तरी लिहिता येईल अशी ठाकुरांनी व्यवस्था करून दिल्याचे जाणवले.

आता तो हृदयंगम प्रसंग मनःपटलावर पुन्हा स्मरू लागला की काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. प्रत्येक कार्यामागे एक सूक्ष्म प्रेरक शक्ती कार्यरत असते. ते कार्य सिद्धीस नेण्यासाठी ठरलेल्या प्रेरक शक्तीबद्दलची कृतज्ञता आपण विसरू शकत नाही. समितीतर्फे उभारल्या गेलेल्या या श्रीरामकृष्ण मंदिराच्या पायाभरणी–पासून, नव्हे, त्यासाठी जागा घेण्यापासून तर थेट मंदिराच्या उद्घाटन सोहोळ्यापर्यंत आम्हा भक्तांना सातत्याने जर कोणाची मदत झाली असेल, तर ती म्हणजे पुण्याच्या रामकृष्ण मठाची. सेवा समितीची स्थापना १९९२ साली झाली, तीच मुळी स्वामी भौमानंदजींच्या उपस्थितीत! त्यावेळेस उपस्थित असलेल्या १० ते १५ भक्तांच्या मनात तर मठ काय, मिशन काय, कशाबद्दल काहीही माहिती नव्हती. फक्त साधुदर्शनाला आलेले हे जिज्ञासू. त्यावेळेस आलेल्या साधूंच्या शुभहस्ते वृक्षारोपण केले गेले, परंतु ते वृक्षारोपण हे प्रतीकात्मक होते. मोठ्या महाराजांनी (स्वामी भौमानंदजी) मनामध्ये एक वेगळेच बीजारोपण केले होते असे आता वाटते. त्या नगर भेटीनंतर महाराजांनी अगदी पद्धतशीरपणे नगरच्या भक्तांना–ठाकुरांच्या भाषेत कच्च्या सोंगट्यांना– घेऊन एक डाव मांडला, श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा समिती या नावाचा. आहे त्या भक्तांमध्ये ठाकुर, माँ, स्वामीजींविषयी प्रेमभक्ती जागवणे व ती दृढ करणे, त्यांना पारमार्थिक जीवनाची वाट दाखवणे व त्या वाटचालीवर त्यांना साहाय्यभूत होणाऱ्या, रामकृष्ण मठ प्रकाशित वाङ्मयाच्या वाचनास प्रवृत्त करणे, भक्तांकडून भक्तसंख्या वाढण्यासाठी त्या ग्रंथांची आयोजिली जाणारी प्रदर्शने व विक्री, महिन्यातून एकदा स्वामी मंत्रानंदांना पाठवून आयोजिलेली शिबिरे, दरवर्षी आंतरशालेय स्पर्धा व व्याख्यानमाला यांसारखे उपक्रम आवर्जून करायला लावणे इत्यादी गोष्टींनी अहमदनगरच्या भक्तांचे वैयक्तिक धर्मजीवन स्वामीजी जसे फुलवत चालले होते तसेच या भक्तांमध्ये सौहार्दपूर्ण संबंध असावेत, मतभेदांचे रूपांतर मनभेदामध्ये होऊ नये, याची देखील ते आवर्जून दखल घेत होते. भक्त पुण्याला गेल्यानंतर त्यांची आस्थेने दोन तीन प्रश्न विचारून चौकशी होई, परंतु तेवढ्यावरूनच ते आमचे अंतरंग जाणत व मनातील प्रश्नांना शब्दरूप देण्याआधीच उत्तरे मिळत व मन शांत होई. आजही हा सर्व भक्तांचा सामाइक अनुभव आहे. त्यामुळेच फक्त मोठ्या महाराजांना भेटण्याचे एकमेव उद्दिष्ट ठेवून मंडळी पुणे मठात जातात. स्वामीजींकडे गेल्यावर 'ठाकुरांचे दर्शन घेतले का ?' या प्रश्नाने मठात येण्याविषयीच्या धारणेमध्ये आपण चुकत आहोत हे लक्षात येते. मग समितीच्या कार्याविषयी चर्चा, कार्यातील अडचणीवर उपाययोजना सुचविणार; मग तो अडथळा आर्थिक असो, भक्तांच्या परस्पर संबंधांचा असो वा भक्तांची ठाकुरांच्या कार्यासंबंधीची तात्पुरती उदासीनता असो; ते त्यावर कधी प्रेमाने समजावून, कधी मूक राहून, तर आवश्यक असेल तेथे थोडे कठोरपणे चुका दाखवून देऊन उपाययोजना करतात व तिसऱ्या प्रकारच्या वैद्यराजाप्रमाणे जबरदस्तीने आमच्याकडून कार्य करून घेतात. परंतु येथे एका गोष्टीचा मोठा विस्मय वाटतो की महाराजांनी आमच्या चुका दाखविल्याबद्दल आम्हाला कधी खंत वाटली नाही. उलटपक्षी ते आपली किती काळजी घेतात व आपल्याकडून कसे सहजतेने कार्य करून घेतात हाच विचार मनात येतो आणि इतके आपण त्यांच्या जवळ आहोत या विचाराने आनंद वाटतो. प्रत्येकालाच ते आपल्या खूप जवळ वाटतात हे आणखी एक आश्चर्य! या प्रकारच्या आगळ्यावेगळ्या औषधयोजनेमुळेच नगरच्या भक्तांकडून तामसवाडी पाणी प्रकल्प, २००४ साली पडलेल्या दुष्काळात २ महिने रोज एक लक्ष लिटर मोफत पाणीपुरवठा, २५० नारायणांना उत्तम प्रतीचे ब्लँकेट वाटप, विशेष प्रसंगी करण्यात आलेल्या

नारायण सेवा यांसारखी सेवाकार्ये घडली. तसेच २०० साधूंचे सामूहिक यतिपूजन, अनेक साधूंनी मार्गदर्शित केलेली अंतर्योग शिबिरे, भावप्रचार परिषदेचे सभासदत्व व वार्षिक सभेचे यजमानपद आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मठाचे स्वतःच्या जागेत श्रीरामकृष्ण मंदिर इत्यादी उल्लेखनीय कार्ये देखील पूर्णत्वास जाऊ शकली. त्यामुळेच समितीला पुणे मठाचा खूप मोठा आधार वाटतो.

भाग्यवंतानो, जसे मोठे महाराज तसेच राजेंद्र महाराज, अजय महाराज व रघू महाराज. गेले वर्षभर राजेंद्र महाराज नगरला येऊन अंतर्योग शिबिरात मार्गदर्शन करतात आणि एखाद्या आईने मुलाला जसे समजावून सांगावे तसे अगदी मातेच्या ममतेने भक्तांच्या आध्यात्मिक जीवनास उपयुक्त अशी शास्त्रे, संतवचने व ठाकुर, माँ, स्वामीजींविषयीच्या गोष्टी सांगतात. अजय महाराज यांनी नगरला मंदिर उद्घाटनाच्या आधी तीन दिवस उपस्थित राहून सर्व व्यवस्था जातीने बघून सर्व कार्यक्रम रेखीवपणे पार पाडून घेतला आणि तो देखील उपलब्ध साधनसामग्री, सुविधा, मनुष्यबळ, समितीची आर्थिक स्थिती यांमधील अपूर्णता स्वीकारून. त्यांनी मंदिर उद्घाटनाच्या आदल्या रात्री दोन वाजेपर्यंत आम्हा भक्तांबरोबर राहून मंदिराची सजावट जातीने करून घेतली होती.

आम्ही भक्त गुरुमहाराजांच्या दर्शनाला पुणे मठात एकत्रितपणे जात असू. त्यावेळेस सायंकाळी ५ वाजता गुरुमहाराजांचे दर्शन, नंतर मठातील इतर स्वामीजींच्या भेटीगाठी व तदनंतर रघू महाराजांच्या आग्रहाला होकार देऊन रात्रीचा प्रसाद मठात घेऊन रात्री तृप्त तनमनाने नगरला परतणे हा दरवर्षी होत आलेला कार्यक्रम ! एकदा प्रसाद न घेताच पुण्याहून निघण्याचा प्रसंग आला; त्यावेळेस आम्हा भक्तांना न चुकता डबा भरून मुडी (चुरमुरे) व मिठाईचा प्रसाद दिला होता. रघू महाराजांचे अद्याप नगरला येणे झाले नसल्याची आम्हास खंत आहे.

पुणे मठात अंतर्योग शिबिराच्या निमित्ताने राहण्याचे प्रसंग आले असताना तेथील प्रत्येक कार्यक्रमाच्या आखणीतील नीटनेटकेपणा, कार्यकर्त्यांमधील शिस्त, त्यांचे अमोल आदरातिथ्य, नियोजित कार्यक्रमातील वक्तशीरपणा या गोष्टी डोळस भक्तांच्या नजरेत भरत. पुण्यातील रामकृष्ण विवेकानंद भावधारेत मुरलेल्या पुण्याच्या भक्तांबरोबर राहिल्यानंतर ज्येष्ठ साधूंचा आदरसत्कार कसा करावा, साधूंशी मनमोकळे हास्यविनोद करत बोलताना देखील लक्ष्मणरेषेचे उल्लंघन होणार नाही याची काळजी कशी घ्यावी या गोष्टी कळत जातात. तसेच रामकृष्ण संघातील मोठा आध्यात्मिक अधिकार असलेले स्वामीजी, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, त्यांचे त्यागमय जीवन इत्यादीबद्दल तपशील या पुणेकरांकडूनच समजू शकतात.

पुण्याच्या मठात पाऊल ठेवल्यानंतर नेत्रांना सुखावणाऱ्या व मनास उल्लसित करणाऱ्या सुशोभित प्रांगणाचे शिल्पकार गोपीमामांपासून तो थेट मुमुक्षूंच्या आध्यात्मिक जीवनास योग्य दिशा देऊन त्यांच्या पारमार्थिक वाटचालीत साहाय्य करणारे स्वामी भौमानंद, वैराग्य हेच ज्यांचे ऐश्वर्य असा प्रेमळ व अगत्यशील संन्यासीगण, शमदमादी षट्संपत्तीच्या साधनेत मग्न असलेला ब्रह्मचारी वृंद आणि मठात कार्यरत असणारे ठाकुरभक्त ही सर्वजण मठात येणाऱ्या प्रत्येक भक्तामध्ये एक सात्त्विक भाव जागृत करीत असतात.

हे सर्व साम्राज्य पाहिल्यावर चिकित्सक वृत्तीच्या मनाला हे जाणवत राहते की एवढी अलौकिक बुद्धिमत्ता असलेले ज्ञानमार्गी, प्रचंड काम शांत व प्रसन्न चित्ताने हातावेगळे करणारे कर्मयोगी आपल्या समोर असूनही आध्यात्मिक क्षेत्रातील यांचा अधिकार समजावून घेण्यास आपले 'साधन' तोकडे पडते. अशा तपस्यापूत हजारो साधूंना एकत्रित ठेवणारी जी एक अद्भुत व अदृश्य

*हार्दिक शुभेच्छा !*

**मे. हिर्लेकर केटरिंग सर्व्हिसेस**

शक्ती आहे ती काय असावी ? या अज्ञात पण प्रकर्षाने जाणवणाऱ्या शक्तीनेच अहमदनगरचे श्रीरामकृष्ण मंदिर उभे राहिले आहे हे निश्चित. त्या प्रेरक शक्तीला ही शब्दपुष्पांजली विनीत भावाने अर्पण.

।। श्रीरामकृष्णार्पणमस्तु ।।

❖ ❖ ❖

## आमचा प्रेरणास्रोत : रामकृष्ण मठ, पुणे

**डॉ. संजय महाजन**, रामकृष्ण–विवेकानंद भावधारा प्रसारक मंडळ, नांदेड

नांदेड हे मराठवाड्यातील महत्त्वाचे शहर. आंध्र प्रदेश आणि कर्नाटक यांच्या सीमेलगत असलेले हे शहर शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यात अग्रेसर आहे. इतर शहरांप्रमाणेच इथेही सर्व जातिधर्माचे लोक राहतात. परंतु विशेष करून शीख समाजाचे लोक अधिक आहेत. कारण या शहरात शिखांचे दहावे गुरू, गुरु गोविंदसिंहजी यांची समाधी व गुरुद्वारा आहे. योगायोगाने येथे असलेले ठाकुरभक्त श्री. रनदले यांच्याशी माझी ओळख झाली. रामकृष्ण–विवेकानंद भावधारेचा येथे प्रचार व प्रसार व्हावा या विचाराने सर्व भक्त एकत्र आले आणि १९९० साली भावधारा प्रसारक मंडळाची स्थापना झाली. आरंभी नागपूर मठातून पुस्तके आणून त्यांच्या विक्रीच्या निमित्ताने प्रचाराचे कार्य सुरू झाले. नंतर श्री. रनदले यांच्या प्रयत्नांनी संस्थेला थोडी जागा मिळाली. त्यावर आश्रम बांधण्यासाठी मात्र पैशांची गरज होती.

याच काळात 'रामकृष्ण–विवेकानंद भाव प्रचार परिषदे'विषयी माहिति मिळाली. या परिषदेचे सदस्यत्व मिळवण्याची खटपट आम्ही सुरू केली. यामध्ये आम्हाला श्रद्धेय स्वामी भौमानंदजी यांनी पुढाकार घेऊन योग्य ते मार्गदर्शन केले. त्यामुळेच आमच्या मंडळाला परिषदेचे सदस्यत्व मिळाले. त्यानंतर खऱ्या अर्थाने कार्यास प्रारंभ झाला.

संस्था कशी वाढवावी, संस्थेच्या कार्यात पारदर्शकता कशी ठेवावी याचे योग्य ते मार्गदर्शन आम्हाला स्वामी भौमानंदजी यांच्याकडून वेळोवेळी मिळत गेले. थोड्याच दिवसांत दीड एकराच्या भूखंडावर नव्या आश्रमाची निर्मिती झाली. ठाकुरमंदिर, सभागृह, साधुनिवास या इमारती त्या जागेवर उभ्या राहिल्या. त्याच वर्षी परिषदेची अर्धवार्षिक बैठक या ठिकाणी घेण्याचे भाग्यही संस्थेला लाभले. त्या परिषदेस स्वामी भौमानंदजी यांच्यासह स्वामी ब्रह्मस्थानंदजी, स्वामी वागीशानंदजी आणि स्वामी सुविज्ञेयानंदजी हजर होते. अनुभव नसल्यामुळे आमच्याकडून या कार्यक्रमात अनेक त्रुटी राहून गेल्या. तरीही सर्व साधूंनी एकूण कार्यक्रम गोड मानून घेतला. त्यावेळी स्वामी भौमानंदजींच्या हस्ते आश्रमाच्या पंचवाटिकेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

'शिवभावे जीवसेवा' या उद्देशाने कार्य चालावे म्हणून कार्यकर्त्यांना मार्गदर्शनाची गरज असते. यासाठी पुणे मठाने आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या शिबिरास आमच्या मंडळातील तीन कार्यकर्ते हजर राहिले होते. स्वामी नीलकंठानंदजी यांनी आमच्यासारख्या समस्याग्रस्त कार्यकर्त्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष शिबिरातील कार्यक्रमांची आखणी, शिस्तबद्धता आणि वेळेचे नियोजन यांतूनच आम्ही बरेच काही शिकलो. अर्थात या साऱ्याचे श्रेय स्वामी भौमानंदजींकडेच जाते. भावधारा परिषदेमध्येही प्रत्येक सदस्याची ते जातीने विचारपूस करतात. विचारलेल्या प्रश्नावर ते शक्यतो तिथल्या तिथेच मार्गदर्शन करतात. त्यामुळे ते आम्हाला आदर्श गुरूच वाटतात. त्यांचे प्रेम व आपुलकी आम्हाला खूपच बळ देऊन जाते.

२५ वर्षांपूर्वी लावलेल्या पुणे मठाच्या रोपट्याचे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. स्वामी भौमानंदजी महाराज आणि हा मठ हे आमचे प्रेरणास्रोत

I.C.T.
COMPUTER EDUCATION
सचोटी, गुणवत्ता अन् विश्वास
INSTITUTE OF COMPUTER TECHNOLOGY
Ph.No. (O) 24358946 (R) 24251043
Cell : 9226855287 Email : ictpune@rediffmail.com

आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच ठाकुरचरणी प्रार्थना !

❖ ❖ ❖

## रामकृष्ण मठ, पुणे - एक दीपस्तंभ

**श्री. नंदकुमार ज. सावंत – कार्यवाह**

रामकृष्ण सेवा मंडळ, सातारा

रामकृष्ण सेवा मंडळ, सातारा आणि रामकृष्ण मठ, पुणे ही जणू भावंडेच. स्वामी भौमानंदजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पुण्याबरोबरच सातारा, भादोले, कोल्हापूर, इचलकरंजी, नगर, अलिबाग, चिंचवड, गोवा ही केंद्रे वाढत राहिली. पुणे मठाच्या २५ वर्षांच्या



वाटचालीचे आम्हीही एक साक्षीदार आहोत. साताऱ्याच्या आश्रमात अनेक नवीन कार्यक्रम व उपक्रम सुरू झाले ते पुणे मठामुळेच. भक्तसंमेलन, पूजनीय गहनानंदजी महाराजांची सातारा भेट, माताजींचा शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सव, विविध साधूंची व्याख्याने आणि भक्त शिबिरे पुणे मठाच्या सहकार्यामुळेच शक्य झाली. पुण्याबरोबरच आजूबाजूच्या गावांमध्येही ठाकुर, माँ, स्वामीजींची भावधारा पोहोचावी म्हणून पुणे मठाने केलेले प्रयत्न कधीच विसरता येणार नाहीत.

मला आठवतेय, साताऱ्याच्या आश्रमाने सहा वर्षांपूर्वी जागा खरेदी करायचे ठरवले. त्याचवेळी महाराज साताऱ्याला आले. आम्हाला म्हणाले, ''आश्रमाच्या जागेसाठी ही अल्पशी मदत'' त्यावेळी आमच्याकडे जागा खरेदीसाठी काहीही रक्कम नव्हती परंतु एका वर्षात जागा खरेदी झाली. त्यानंतर कधीही पुण्याला गेलो की महाराज म्हणायचे, ''बांधकामाचं काय ? कधी काम सुरू करणार आहात?'' त्यानंतर आम्ही प्लॅन तयार केला, महाराजांना दाखविला. पूजनीय गौतमानंदजी महाराजांच्या हस्ते भूमिपूजन झाले. १० महिन्यांत बांधकाम पूर्ण झाले. या दरम्यान नागपूर मठात मंदिराचे उद्घाटन होते. आम्ही महाराजांना भेटलो. सातारा आश्रमाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनाचा विषय त्यांच्यासमोर काढला तेव्हा महाराज म्हणाले, ''रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशनचे अध्यक्ष प.पू. स्वामी गहनानंदजींना बोलावू. तुम्ही तसे महाराजांना पत्र द्या.'' लगेच नागपूरमध्ये पत्र तयार केले व महाराजांना दिले आणि आमच्या प्रेमापोटी महाराजांनी गुरुमहाराजांना निमंत्रण दिले. आम्हाला खूपच आनंद झाला. नंतर गुरुमहाराजांच्या तब्येतीमुळे ते येऊ शकले नाहीत; पण या प्रसंगातून दिसून आले महाराजांचे आमच्यावरचे अपत्यवत प्रेम आणि अपार विश्वास. महाराजांच्या आशीर्वादामुळे बघता बघता विवेकानंद भवन उभे राहिले. त्यात अभ्यासिका, पॅथॉलॉजिकल लॅब, ग्रंथालय, विवेकानंद वैद्यकीय सेवा असे कार्य सुरू झाले.

प्रत्येक नवीन उपक्रमासाठी मोठे महाराज आम्हाला प्रोत्साहन द्यायचे, अडचणीत मार्गदर्शन करायचे. त्यांचा हा पाठीवरचा हात आम्हाला मोठे बळ देऊन जायचा, प्रत्येक वेळी पुणे मठात विचारायचे आणि पुढे पाऊल टाकायचे. असे कधी जाणवलेच नाही की, पुणे मठ आणि साताऱ्याचा आश्रम वेगळा आहे. जणू काही पुणे मठाचाच एक भाग.

२००५ साली अतिवृष्टीमुळे सर्व महाराष्ट्रात हाहाकार माजला होता. सातारा जिल्ह्यात पाटण भाग जलमय झाला होता. आम्हाला पुणे मठातून फोन आला. 'पाटणला जाऊन सर्व्हे करा आणि आम्हाला कळवा.'

आम्ही पाटणला गेल्यावर पाहिले, पाण्याने हाहाकार माजवला आहे. कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. आम्ही तातडीने पुणे मठाशी संपर्क साधून माहिती दिली आणि पुणे मठाने तातडीने मदत पाठवली. आमच्या स्वयंसेवकांमार्फत आम्ही मठाच्या मार्गदर्शनाखाली सेवा

कार्य केले. हा अनुभव आम्हाला बरेच काही शिकवून गेला. पुणे मठाच्या प्रेरणेनेच आम्ही सेवाकार्य करू शकलो. साहित्य मिळाल्यावर पूरग्रस्त लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद शब्दात वर्णन करता येऊ शकत नाही.

नुकतेच एप्रिलमध्ये सातारा आश्रमाच्या मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले. त्याबरोबर संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यात आला. वैद्यकीय विभागात X-Ray विभाग सुरू झाला. आम्ही पुणे मठात गेलो होतो. त्यावेळी कळले की, एप्रिल २००८ मध्ये प. पू. स्मरणानंदजी महाराज, उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ आणि मिशन पुण्याला येणार आहेत. आम्ही महाराजांना भीत भीत म्हणालो, ''महाराज, नूतनीकरण केलेल्या मंदिरात प्रतिमांची पुनःस्थापना व X-Ray मशिनचे उद्घाटन गुरुमहाराजांच्या हस्ते व्हावे असे फार वाटते.'' महाराजांनी लगेच सहर्ष संमती दिली व पत्र लिहिण्यास सांगितले. बघता बघता गुरुमहाराजांचा कार्यक्रम ठरला. आता नवीन तरुणांकडे पदभार आहे. त्यामुळे आम्हाला मोठी जबाबदारी वाटत होती. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी पुणे मठात आमचे सारखे फोन चालू होते. महाराजांचे स्वागत, उद्घाटनाचा कार्यक्रम, पूजा, भजन यांबरोबरच पूजनीय महाराजांची भोजन व विश्रांती तसेच इतर साधूंची व्यवस्था इ. सर्व काही पाहायचे होते. खरेतर खूपच टेन्शन होते. परंतु मोठे महाराज, स्वामी आत्मविकासानंद, स्वामी सुविज्ञेयानंद यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन यांमुळे कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. पूजनीय महाराजांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन या बळावरच हे सर्व काही शक्य झाले.

नुकतेच महाराजांचे पत्र आले की, पुणे मठाविषयी काही लिहा. लिहिण्यासाठी लेखणी हातात घेतली आणि मग विचारांच्या ऊर्मी उसळू लागल्या. काय लिहावे किती लिहावे काहीही समजेना. आमच्या साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्याएवढे महाराजांचे आणि पुणे मठाचे आम्हा मुलांवर प्रेम आहे ते शब्दांत कसे मांडणार ? परंतु वडिलांना लहान मुलगा बाबा म्हणतो आणि वडीलही ते मुलाचे बोबडे बोल जाणतात. तसेच हे ...... आणखी काय ?

❖ ❖ ❖

## रामकृष्ण मठ, पुणे - एक आधारवड !

**श्री. भालचंद्र (सुनील) देशपांडे,**

श्रीरामकृष्ण–विवेकानंद सेवा समिती, अलिबाग

पंधरावीस वर्षांपूर्वीचे अलिबाग म्हणजे कोकणातल्या इतर गावांप्रमाणेच एक शांत, निसर्गरम्य गाव. संध्याकाळी ७ वाजल्यानंतर सगळीकडे शुकशुकाट. राष्ट्रीय केमिकल्स अॅन्ड फर्टिलायझर्सचा प्रकल्प आल्यामुळे काहीशी जाग आलेली. हळूहळू बाहेरून आलेल्या लोकांमुळे अनेकविध विचारधारांचा अलिबागमध्ये शिरकाव होऊ लागला. यांमध्ये प्रामुख्याने श्रीरामकृष्ण विवेकानंद भावधारेचा समावेश करावा लागेल. अलिबागमध्ये ही भावधारा रुजविण्याचे सर्व श्रेय मुख्यतः परमपूजनीय स्वामी भौमानंदजी महाराज, अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे यांना आहे.

१९९२–९३ सालची गोष्ट आहे. पुणे मठाशी आमचा पूर्वीपासूनचा संबंध. नेहमी स्वामीजींना 'आपण अलिबागला कधी येणार ?' असा आमचा प्रश्न असायचा. 'लवकरच कधीतरी येऊ', असे उत्तर असायचे. पण यावेळी त्यांनी 'मी अमुक दिवशी निश्चित येतो,' असे सांगितले. ती महाराजांची प्रथम अलिबाग भेट. त्यावेळी डॉ. पटवर्धन, श्री. दिलीप गुर्जर व आमचे घर अशी तीनच घरे अलिबागमध्ये मठाशी संबंधित अशी होती. प. पू. महाराज येणार म्हणून इतरही काही मित्रमंडळी व भक्त लोकांचे एक घरगुती संमेलन आम्ही आयोजित केले होते. प. पू. महाराजांच्या प्रेमपूर्ण प्रोत्साहनाने व सर्वांना आपलेसे करण्याने जमलेल्या सर्व मंडळींनी एक ठराव केला. श्रीठाकुरांचा जन्मवार बुधवार म्हणून त्यादिवशी दर आठवड्यात एकत्रित होण्याचे ठरले. तीच अलिबागच्या सेवा समितीची मुहूर्तमेढ ठरली.

सुरू केलेला साप्ताहिक सत्संग दृढनिश्चयाने सुरू होता. यामध्ये श्रीवचनामृत पठण, संध्यारती नित्यनेमाने होत होती. पुढे मग प्रत्येक एकादशीला रामनाम संकीर्तन असा कार्यक्रम सुरू झाला. याशिवाय लवकरच महाराजांच्या मार्गदर्शनाने ''स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला'' व तालुका स्तरीय मराठी व इंग्रजी वक्तृत्व तसेच संस्कृत पाठांतर स्पर्धेचे आयोजन करू

लागलो. याकरिता पुण्यातील श्री. प्रफुल्ल तुंगारे, श्री. दुबे, प्रा. धारणे सर, श्री. गो. ना. नातू व श्री. विजय कुलकर्णी यांचे मनःपूर्वक सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या सर्वांनी घालून दिलेल्या पायंड्याने आज एक मोठे स्वरूप धारण केले आहे. या वर्षी विभागवार स्पर्धा आयोजित करण्यात आली व विभागांतून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी घेण्यात आली. त्यांतून विजयी स्पर्धकांना पुरस्कार देण्यात आले. एकूण ४३ शाळांपैकी २८ शाळा सहभागी झाल्या व एकूण ४७० स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला.

पूर्वी पुणे मठातून स्लाइड प्रोजेक्टर पडदा घेऊन भक्त यायचे आणि त्यांच्या सोबत अलिबागमधील भक्त मग परिसरातील सर्व शाळांमधून स्लाईड शो प्रवचनासहित करीत. याद्वारे जवळ जवळ ४ ते ५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत स्वामीजींच्या चरित्राचा प्रसार झाला.

१ मार्च २००१ रोजी डॉ. अनिल पटवर्धनांनी सेवा समितीच्या कार्याकरिता एक छोटी जागा वापरण्यास देऊ केली. अलिबागच्या इतिहासात एका प्रदीर्घ पर्वाची सुरुवात या दिवशी झाली असे म्हणावे लागेल. परमपूज्य स्वामी भौमानंदजी महाराज, स्वामी योगात्मानंदजी महाराज व स्वामी तत्त्वरूपानंदजी महाराज यांच्या पावन हस्ते श्रीठाकुर, श्रीमाँ व स्वामीजींच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना झाली. सध्या याच ठिकाणाहून सेवा समितीचे सर्व कार्य चालते. नित्य संध्यारती, दर बुधवारी संकीर्तन, एकादशीला रामनाम संकीर्तन, सर्व अंतरंग शिष्यांच्या जयंती असे कार्यक्रम साजरे होत असतात.

अलिबाग केंद्र हे एक भाग्यवान केंद्र आहे. पुणे व मुंबई दोन्ही शहरे येथून जवळच असल्याने ‘सरस्वती व लक्ष्मी’ या दोघींचे आशीर्वाद आम्हाला लाभत असतात. मुंबईचे प. पू. स्वामी वागीशानंदजी महाराज व प. पू. स्वामी तत्त्वरूपानंदजी महाराज यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद आम्हाला पाठबळ देत असतात, तर पुण्याचे पू. भौमानंदजी महाराज यांचे मार्गदर्शन व प. पू. सुविज्ञेयानंदजी महाराज यांचा सत्संग लाभ होतो. वर्षातून दोनदा अंतर्योग शिबिराचे आयोजन केले जाते.

रायगड जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथे मोठ्या प्रमाणात आदिवासी वस्त्या आहेत. या समाजामध्ये शैक्षणिक, आरोग्यविषयक मागासलेपण बरेच आहे व त्यामुळे गरिबीही हातात हात घालून आहे. अलिबाग केंद्रातर्फे सहाणगोठी, कुसुंबळे व महान येथे सातत्याने कार्य होत असते. गरजू, गरीब विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर, वह्या व इतर शालेय साहित्य दरवर्षी साधारणपणे २०० ते २२५ विद्यार्थ्यांना पुरविले जाते. कुसुंबले व महान येथे दर रविवारी दवाखाना चालविला जातो. मोफत तपासणी व ॲलोपॅथी औषध दिले जाते. आतापर्यंत जवळपास ४००० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. मुंबई मठाच्या सहकार्याने विविध आदिवासी वाड्यांवर आजपावेतो ९ मोफत नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया शिबिरे झालीत व त्याद्वारा ४०० हून अधिक मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

२६ जुलै २००५ रोजी रायगड जिल्ह्यात पुराने थैमान घातले होते. तशातच दासगाव, जुई, कोंडिवते या गावांवर डोंगर कोसळून संपूर्ण गावे ढिगाऱ्याखाली गाडली गेल्याचे कळले. सेवा समितीची तातडीची बैठक घेण्यात आली. आपण घटनास्थळी जाऊन काही सेवाकार्य करावे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेण्याचे ठरले. जिल्हाधिकाऱ्यांची रात्रीच भेट घेतली असता त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी निघण्यास सांगितले व पिण्याचे पाणी फार आवश्यक असल्याचे नमूद केले. सर्व विचार करता मदत कार्यास कमीत कमी ५०,००० रुपयांची तातडीची गरज होती. काय करावे या विचारात सगळे असताना पुणे मठ व महाराजांची आठवण झाली. पूजनीय स्वामी आत्मविकासानंदांना फोन केला. परिस्थिती सांगितली, ते म्हणाले, १० मिनिटांत महाराजांशी बोलून सांगतो. अक्षरशः १० व्या मिनिटाला होकाराचा फोन आला. लगेच कामाला लागलो. रात्रीतून टेम्पो ठरवून १००० पाण्याच्या बाटल्या, ४०० किलो फरसाण, १००० टोस्ट पॅकेट व १००० डझन केळी घेऊन सकाळी ६ ला मदत कार्याकरिता प्रस्थान केले. जुई येथे पोहोचणारी अलिबाग सेवा समिती पहिली ठरली.

अत्यंत अल्प वेळात देऊ केलेल्या आर्थिक साहाय्यामुळेच हे शक्य झाले. अजून काय लिहू ? असाच लोभ व कृपा अलिबागमधील आम्हा सर्व भक्तांवर राहावी हीच श्रीठाकुरचरणी प्रार्थना.

।। श्रीरामकृष्णार्पणमस्तु ।।

❖ ❖ ❖

## श्रीठाकुरांची अहेतुक कृपा

**श्री. अशोक राजवाडे,**
रामकृष्ण–विवेकानंद सेवाश्रम, नासिक

अचानकपणे एका प्रसन्न सकाळी पुण्याच्या रामकृष्ण मठात माननीय आगटे मॅडम यांच्याबरोबर आम्हा दोघांना जाण्याचा योग आला. फाटकातून आत शिरल्याबरोबर तेथील प्रसन्न वातावरणाने मन भारावून गेले. अचानकपणे मठात झालेले जाणे आमच्या दृष्टीने भविष्यकाळासाठी एक 'सुवर्णसंधी' होती याची त्या क्षणी अजिबात कल्पना आली नाही. मंदिरात जाऊन भगवान श्रीरामकृष्णांचे दर्शन घेतले आणि आगटे मॅडमनी आम्हाला पुणे मठाचे अध्यक्ष परमपूज्य भौमानंदजी महाराज यांच्याकडे नेले. अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी की ओळख झाल्याबरोबर स्वामीजींनी आगटे मॅडमना आमचा घरचा पत्ता व फोन नंबर लिहून घेण्यास सांगितले. आम्हाला वाटले सहजच सांगितले असेल. परंतु हे सांगण्यामागचा उद्देश अनपेक्षित आणि आश्चर्यकारकही होता. कारण स्वामीजींनी आमच्यावर नासिक येथील रामकृष्ण भावधारेची जबाबदारी सोपविण्याचा त्यांचा मानस बोलून दाखविला. त्यांचेच शब्द सांगावयाचे झाल्यास ''मला माणूस सापडला. मी सांगितलेल्या कामगिरीस तुम्ही सुरुवात करावयाची आहे. ही माझी ऑर्डर आहे. हा ईश्वरी संकेत आहे. ही ठाकुरजींची इच्छा आहे.''

आम्ही दोघे अवाक झालो. आमच्याविषयी काहीही माहिती नसताना आमच्यावर ही जबाबदारी त्यांनी कशी सोपविली, याचे आश्चर्य करीत आम्ही त्यांना म्हणालो, ''आध्यात्मिक कार्याशी आजपर्यंत आमचा संबंध आलेला नाही. रामकृष्ण भावधारेची आम्हाला ओळख नाही. असे असताना आम्ही हे काम कसे करू शकू असा प्रश्न आमच्या मनात उभा आहे.'' असे म्हणताच स्वामीजी म्हणाले, ''मी तुम्हाला आताच सांगितले ना, हा ईश्वरी संकेत आहे. त्यामुळे तुम्ही कुठलेही प्रश्न मनात आणू नका.'' ही आमची स्वामी भौमानंदजींची व रामकृष्ण मठाची झालेली पहिली भेट व पहिली ओळख.

या भेटीनंतर (घरी जात असतानाच) नासिकला परतत असतानाच मनात विचार येत होते की, माणसाला पाहिल्याबरोबर प्रथम भेटीतच त्याच्याविषयी विश्वास निर्माण होण्याची शक्ती स्वामीजींच्या ठिकाणी कशी काय आली असेल ? आणि दुसरी गोष्ट म्हणजे आम्हा दोघांच्याही मनात स्वामीजींविषयी कुठलाही किंतू मनात डोकावला नाही. किंबहुना त्यांच्याविषयी एक श्रद्धेचा भावच मनात जागा झाला होता. त्यांनी आमच्याविषयी विश्वास दाखविणे आणि आमच्या मनात श्रद्धा निर्माण होणे या दोन्ही गोष्टींमागे स्वामीजींची तपस्या कारणीभूत असणार. आमच्याकडूनही ईश्वराला थोडी फार तपस्या करून घ्यायची असणार असे वाटून आम्ही कामाला लागलो.

नासिकमध्ये आल्यानंतर हे काम करण्याची दिशा सापडत गेली. १० फेब्रुवारी २००८ रोजी ठाकुरजी, माताजी आणि विवेकानंदजी यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना झाली. गेले वर्षभर सर्व धार्मिक कार्यक्रम भक्तांनी यथासांग केले. सायंआरती, संस्कार वर्ग, रामकृष्ण मिशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची विक्री, गरिबांसाठी वैद्यकीय मदत अशी कार्ये वर्षभर सुरळीतपणे चालू झालेली आहेत. येथील ट्रस्टला 80 G मिळाल्याने ही कार्ये सुरळीतपणे करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होऊ शकला. तसेच ट्रस्टला पावणेदोन एकर जागा पुढील कार्यासाठी घेणे शक्य झाले. ठाकुरजींची इच्छा असल्यास योजलेली कामे कशी पूर्ण होतात याची प्रचिती आली.

भावधारेचे काम करत असताना आम्हाला अनंत अडचणी येत गेल्या परंतु यांतून मार्ग कसा काढावयाचा

हे सांगणारे मार्गदर्शकही स्वामीजींनी पाठविले. ते मार्गदर्शक म्हणजे आदरणीय अजय महाराज आणि राजेंद्र महाराज! त्यांच्या सल्ल्यानुसार आम्ही नासिकवासी भक्तगण यथाशक्ती काम करत आहोत. ठाकूरजी ते काम गोड मानून घेवोत ही ठाकुरजींच्या चरणी प्रार्थना !

श्रीरामकृष्णार्पणमस्तु !!

❖ ❖ ❖

## प्रेरणा-प्रोत्साहन व कृपेचा हस्त

**श्री. सदाशिव कोलते,** श्रीरामकृष्ण - विवेकानंद सेवाश्रम, नरवेल, ता. मलकापूर, जि. बुलढाणा

ईश्वरी योगायोगाने १९६० साली प. पू. यतीश्वरानंद महाराज या थोर साधूशी माझी गाठ पडली आणि अक्षरशः माझ्यावर त्यांनी अद्भुत कृपा केली. अनपेक्षितपणे मला नागपूरपासून फक्त २५ मैल दूर असलेल्या माळेगावच्या प्रकाश हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली. मग काय, नागपूर मठात माझे वारंवार जाणेयेणे सुरू झाले. सवड मिळताच मी मठाकडे धावत सुटे. त्या काळाला सुवर्णकाळच म्हटला पाहिजे. कारण त्या दिवसांत मला पू. भास्करेश्वरानंदजी, पू. व्योमरूपानंदजी पू. भाष्यानंदजी, पू. राकानंदजी आणि पू. भौमानंदजी ह्या अत्यंत थोर थोर साधुपुरुषांचा सत्संग लाभला. आता मलाच माझ्या त्या भाग्याचा खरोखर हेवा वाटतो.

जीवनात आलेल्या समस्या, वादळे या साऱ्यांत वरील सत्संगाने मला अलगदपणे तारले. स्वामी व्योमरूपानंदांनी माझ्या मनातील ठाकुरांवरची श्रद्धा अनेक पटींनी वाढवली. माझे मन शांत व खंबीर केले.

काही वर्षांनी मला नरवेलला म्हणजे माझ्याच गावी शाळेत नोकरी मिळाली. शाळेमध्ये मी ठाकुर–माँ–स्वामीजी यांच्या जयंतीनिमित्ताने कार्यक्रम सादर करू लागलो. विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या स्पर्धा सुरू केल्या; भगवद्गीता पाठांतर, वक्तृत्व वगैरे. त्या निमित्ताने पू. व्योमरूपानंदजी, पू. राकानंदजी, पू. भौमानंदजी महाराज शाळेत येऊन गेले. या सर्वांच्या प्रेरणेने नरवेललाच १९८७ साली रामकृष्ण–विवेकानंद सेवाश्रम सुरू केला.

एवढ्याशा खेड्यात आश्रमाला जागा कोठून मिळणार? शिवाय सारे गाव चढउतारांचे. मोठ्या मुष्किलीने एक खोली भाड्याने मिळाली. तिथे पाच वर्षे गेली. पुन्हा जागेचा प्रश्न राक्षसासारखा उभा राहिला. अखेर स्वतःच्या घरातच आश्रम सुरू ठेवला.

परंतु स्वामी भौमानंदमहाराजांनी मात्र आमचा हात कधीच सोडला नाही. या सेवाश्रमात ते वेळोवेळी मोठमोठ्या वक्त्यांना घेऊन आले. उदा. ज्ञानेश्वर सप्तशताब्दीच्या वेळी मा. डॉ. करंदीकरांना आणून त्यांचे प्रवचन ऐकवले; प. पू. वागीशानंद महाराज ह्या मोठ्या लोकांनाही आणून त्यांचे विचार नरवेलकरांना ऐकवले.

एकदा तर भावधारा परिषदेचे अधिवेशन नरवेललाच घ्यायचे ठरवले. ज्येष्ठ साधूंच्या आज्ञेप्रमाणे आम्ही तयारीला लागलो. विवेकानंद विद्यालयात आदल्या दिवशी रात्रभर कार्यकर्ते व्यवस्थेच्या कामाला जुंपलेले होते. सुमारे ४ वाजता मुसळधार पाऊस सुरू झाला. शाळेवर पत्रे घातलेले असल्याने पावसाचा ताशा जोरातच वाजू लागला. दिवसभर पाऊस राहिला तर कार्यक्रमाची काय वाट लागेल, या चिंतेने आम्ही सारेच हबकून गेलो. पण ईश्वरकृपेने ८ वाजता पाऊस थांबला. पावसाने उलट आजूबाजूचा उतारावरील परिसर अक्षरशः स्वच्छ, चकचकीत केला. सर्व साधू आनंदित झाले. कार्यक्रम उत्तम पार पाडला.

नरवेल अगदी खेडेगाव. शिक्षकही बाहेरगावी राहून फक्त नोकरीला तिथे येतात. इतर कोणी शिक्षित नाही. भावधारा केन्द्रावर ११ जणांचे मंडळ नेमावे असा नियम. आणायचे कुठून ? नावे ११ मिळतील पण हजर किती असतील, हा प्रश्नच आहे. त्यामुळे मी एकटाच. कदाचित मी गेल्या १८ वर्षांत एकही कार्यकर्ता निर्माण करू शकलो नाही, हा माझाही दोष असेल. शेवटी भावधारेतून नरवेल आश्रमाचे नाव कमी करावे, या निर्णयाप्रत मी आलो. परंतु स्वामी भौमानंद महाराजांनीच पुन्हा उभारी दिली. डॉक्टर अडवानी यांनीही आग्रह धरला आणि आमचा खटारा पुन्हा चालू झाला.

असे असले तरी बाहेरगावच्या उत्सव–समारंभात नरवेलकर भक्त अगत्याने हजेरी लावतात. सर्व जाति–धर्मांचे भक्त या सेवाश्रमात एकत्र येतात. शेदीडशे लोकांनी

मंत्रदीक्षाही घेतलेली आहे.

आनंदाची गोष्ट म्हणजे आश्रमाला १० गुंठे जागा दान मिळाली आहे. त्या जागेत आजच्या घडीला एक पत्र्याची शेड उभी केली आहे. सगळीकडे गांजणारी आर्थिक समस्या आमच्याकडेही आहे. परंतु श्रीठाकुर त्यांची कृपा नरवेलवर करतील असा ठाम विश्वास आहे. मार्गदर्शनाला खंबीर आधारवडासारखे पू. भौमानंदमहाराज उभे आहेत. या बळावरच मार्चमध्ये काम सुरू करण्याचा संकल्प केला आहे. तो सिद्धीस न्यावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

❖ ❖ ❖

## रामकृष्ण मठ, पुणे यांच्याकडून मिळालेली प्रेरणा

**श्री. जी. बी. निपाणकर,**
रामकृष्ण विवेकानंद सेवाश्रम, शिऊर,
ता. जामखेड, जि. अहमदनगर

शिऊर हे नगर जिल्ह्यातल्या जामखेड तालुक्यातील एक चार हजार वस्तीचे गाव. शेती हा मुख्य व्यवसाय व बहुतांशी शेती जिरायत. तसा नगर जिल्हाच दुष्काळी, त्यामुळे शिऊरलाही पाणी बेतासबातच. परिणामी गावातील काही तरुण शेती करण्याऐवजी जामखेडला नोकरीस जातात.



आमच्यापैकी एक सहकारी मूळचे ह्या शिऊरचे ! बऱ्यापैकी शेती पण नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य नगरला. योगायोगाने हे गृहस्थ पुण्याच्या 'रामकृष्ण मठा'च्या संपर्कात आले. यथावकाश दीक्षाही झाली व या गृहस्थांना प्रकर्षाने वाटू लागले की, आपल्या गावात श्रीठाकुरांचे काही कार्य सुरू व्हावे. यासाठी त्यांनी आपली जमीन देऊ केली. ही गोष्ट सन २००१ च्या सुमाराची.

प. पू. भौमानंद महाराजांना ही कल्पना सांगितल्यावर त्यांनी खूप प्रोत्साहन दिले. त्यांनी स्वत: रस्त्याची सोय नसताना ही जागा पाहिली. पू. स्वामी मंत्रानंद महाराज, जे तेव्हा पुणे मठात होते, त्यांनीही शिऊरला भेट दिली.

पण नंतर बरीच वर्षे गाडे इथेच थांबले. प्रत्यक्ष कार्य कसे सुरू करावे हे आम्हाला कळेना. नगर–जामखेड रस्ता खराब होता. जामखेड ते शिऊर फाटा हा रस्ता तर अतिशय चिंचोळा व खराब होता आणि फाट्यापासून गावापर्यंत रस्ताच नव्हता. (आता हा सर्व रस्ता डांबरी झाला आहे. तरीही शेवटचे ५०० मी. अंतर फुफाट्यातूनच जावे लागते.) तेव्हा आमच्या पुढे प्रश्न होता ह्या '९० कि.मी. च्या अंतराचा व माणूसबळाच्या अभावाचा'....!

सतत चर्चा तेवढ्या घडत. पण प्रत्यक्षात मात्र काहीच घडत नव्हते. प. पू. महाराजही आम्हाला अधून मधून विचारत. परंतु आमच्याकडे काहीच ठोस असे नियोजन नव्हते.

अखेर २००५ च्या जानेवारीत अशीच चर्चा करता करता आम्ही ठरवले की स्वामीजींच्या तिथिपूजेला आश्रम सुरू करायचाच ! पूर्वोक्त प्रश्न तर होतेच पण त्याचबरोबर समोर होता पुणे मठाचा आदर्श ! अवघ्या वीस वर्षांत झालेला या मठाचा प्रचंड विस्तार ! यापासून प्रेरणा घेऊन आम्ही कार्य सुरू करायचे ठरविले. श्रीठाकुर, श्रीमाँ व श्रीस्वामीजींना आपण शिऊरला नेऊन बसवू, मग पुढचे तेच पाहून घेतील.

ह्याच उत्साहात जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात आम्ही काहीजण पुणे मठात गेलो. प. पू. महाराजांना प्रणाम करून सांगितले की शिऊरला काम सुरू करीत आहोत व त्यासाठी फोटो न्यायला आलो आहोत. प. पू. महाराजांनी खूप आशीर्वाद दिले व सांगितले की ग्रंथविकी विभागामध्ये जाऊन हवे ते फोटो घेऊन जा, पैसे मी देईन !

आम्हाला हा मोठाच शुभशकुन वाटला. आम्ही उत्साहात ग्रंथविक्रीमध्ये गेलो. त्यावेळी तिथली व्यवस्था

श्री. हिरुदादा पहात असत. आम्ही गेल्याबरोबर ते म्हणाले, ''कोणते फोटो हवे आहेत ?'' आम्ही आश्चर्यचकित ! तेव्हा त्यांनी सांगितले की प. पू. महाराजांनीच त्यांना तसा आत्ता फोन केला होता.

अखेर विश्ववंद्य स्वामीजींच्या तिथिपूजेच्या दिवशी शिऊरच्या एका पडक्या घरात श्रीठाकुर, श्रीमाताजी व श्रीस्वामीजींच्या प्रतिमा ठेवण्यात आल्या व शिऊर सेवाश्रमाची सुरुवात झाली.

त्यानंतर संस्थेची घटना तयार करून प. पू. महाराजांकडून तिला मान्यता घेतली व २ फेब्रु. २००६ रोजी संस्था रजिस्टर झाली. उपरोक्त गृहस्थांनी आपली २.७५ एकर जमीन संस्थेला देऊन रीतसर दानपत्र केले. मुहूर्त होता १० फेब्रुवारी २००६ ! नागपूर मठातील नूतन मंदिरातील ठाकुरांच्या प्रतिष्ठापनेचा दिवस !

१६ मार्च २००६ ते २३ जुलै २००६ या अल्पकाळात आश्रमाची पहिली वास्तू 'रामकृष्ण कुटिर' उभी राहिली. २३ जुलै २००६ रोजी श्रीठाकुर, श्रीमाताजी व श्रीस्वामीजी यांची विधिवत् प्रतिष्ठापना पू. अजय महाराज व पू. राजेंद्र महाराजांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते औरंगाबाद आश्रमाचे प्रमुख पू. स्वामी विष्णुपादानंद महाराज !

या सर्व कालावधीत आम्ही पुणे मठाचे कार्य व तेथील स्वामीजींची कार्यपद्धती यांचे बारकाईने अवलोकन करत होतो. आणि यातूनच आम्हाला समजून आले की ह्या युगासाठी सेवायोगच आवश्यक आहे.

सेवायोग हेच सूत्र धरून आम्ही सेवाश्रमाच्या कार्याची आखणी केली. ऑगस्ट २००७ पर्यंत 'सारदा कुटिर' व 'आनंद कुटिर' या दोन वास्तू उभारण्यात आल्या. त्यांचे भूमिपूजनही प. पू. भौमानंद महाराजांनीच २० जानेवारी २००७ रोजी केले. ८ ऑगस्ट २००७ रोजी पू. विष्णुपादानंद महाराजांनी त्यांच्या हस्ते हवन करून वरील वास्तूंची विधिवत् पूजा केली.

आज हा सेवायोग चार स्तरांवर आचरण्याचा आमचा प्रयत्न आहे.

१) श्रीठाकुर सेवा – श्रीठाकुर, श्रीमाँ व श्रीस्वामीजींची सेवा म्हणून रोज आरती, प्रसंगानुरूप होम, हवन, चंडीपाठ, रुद्रपाठ, जप, ध्यान यांसारखे धार्मिक कार्यक्रम व त्यासाठी सुंदर प्रार्थना गृह.

२) पार्षद सेवा – श्रीठाकुरांच्या पार्षदांची सेवा म्हणून विविध मठांमधील स्वामीजींना निमंत्रित करून त्यांची सेवा व त्यासाठी सर्व सोयींनी सुसज्ज असलेले तीन साधुनिवास ! भारतभर विखुरलेल्या रामकृष्ण मठाच्या विविध केंद्रातून आलेल्या साधूंच्या परिसस्पर्शाने ही वास्तू पुनीत झाली आहे.

३) जीवसेवा – श्रीठाकुरांच्या संतानांची सेवा, यासाठी विपुल औषधांचा साठा असलेला दवाखाना, १० विद्यार्थ्यांसाठी सोय असलेले विद्यार्थी गृह, अभ्यासिका, वैद्यकीय शिबिरांचे आयोजन, श्रीमाताजींच्या तिथिपूजेला सर्वांना भोजन, प्रसाद, पुस्तक वाटप, स्वेटर वाटप, इ. कार्यक्रम राबवले जातात. याशिवाय दरवर्षी तीन दिवसांच्या प्रबोधनात्मक व्याख्यानमालाही आयोजित करतात.

४) भक्तसेवा – श्रीठाकुरांच्या पुरुष व महिला भक्तांसाठी स्वतंत्र निवासव्यवस्था. येथे येऊन ठाकुरांच्या उपदेशाप्रमाणे एकांतवास करण्याची सोय. याशिवाय सुसज्ज सभागृह ज्याच्या माध्यमातून साधूंचा सत्संग, आध्यात्मिक शिबिरे, इ. चे आयोजन. याशिवाय येणाऱ्या भक्तांसाठी ग्रंथालयाची सोयही आहे. प्रशस्त स्वयंपाकघर व भोजनगृहाची सुविधाही उपलब्ध आहे.

अशाप्रकारे २००१ साली मिळालेल्या प्रेरणेतून हा सेवाश्रम उभा राहिला व आज रामकृष्ण मठ व मठांच्या स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली कार्य करीत आहे.

एका वाक्यात सांगायचे तर शिऊरचा सेवाश्रम उभा राहिला तोच मुळी पुणे मठाच्या अर्थात प. पू. स्वामी भौमानंद महाराजांच्या प्रेरणेमुळे व प्रोत्साहनामुळे!

❖ ❖ ❖